सं. फौ.प्र.क्रं. २८१६/२०२२
शासन वि- अक्षय बबनराव मेश्राम
सीएनआरक्र. एमएचवायए०३००४४२६२०२२
नि. क्र. १४ सोबत

MHYA030044262022

न्यायनिर्णय
(घोषीत दिनांक: २७ सप्टेंबर, २०२३ )

प्रस्तूत प्रकरणी आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) खालील दंडनिय गुन्हयासाठी खटला चालविण्यात आला आहे.

२. अभियोग पक्षाच्या हकीकतीचा विचार करता खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित होतात. त्यावर मी माझे निष्कर्ष त्याखालील नमुद कारणांआधारे नोंदविले आहेत.

| विचाराधिन मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक २९.०८.२०२२ रोजी आरोपी बेकायदेशिररित्या ग्राम खटेश्वर, ता. व जि यवतमाळ, येथे एका प्लॅस्टीक कॅनमध्ये १० लिटर गावठी हातभट्टीची दारु किंमत १,०००/-रुपये विनापरवाना बाळगतांना मिळून आला ? | : | नाही |
| २) आदेश कोणते ? | | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिंमासा

३. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने केवळ एका साक्षदाराची साक्ष तपासली. त्यामध्ये राकेश भानुदास दातार (सा.क्र.१) याची साक्ष नि. क्र.१४ सोबत नोंदविलेली आहे. अभियोग पक्षास वरील तोडी पुराव्याशिवाय कोणताही लेखी पुरावा शाबीत करता आलेला नाही.

४. आरोपीवर ठेवण्यात आलेला आरोप सिध्द होण्यासाठी अभियोग पक्षास आरोपी नमुद घटनास्थळी अवैधरित्या १० लिटर गावठी हातभट्टीची दारु जवळ बाळगतांना मिळून आला ही बाब शाश्वत संशयापलीकडे जावून शाबीत करणे गरजेचे आहे. त्यासाठी अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या साक्षीचे बारकाईने अवलोकन करणे गरजेचे आहे.

### मुद्दे क्रमांक १ व २ करिता :-

५. राकेश भानुदास दातार (अभियोग साक्षीदार क्र.१) हा त्याच्या पुराव्यामध्ये आरोपीकडून १० लिटर गावठी हातभट्टीची दारु जप्त केल्याची बाब स्पष्टपणे नाकारतो. त्याने अभियोग पक्षाच्या खटल्यास सहाय्य केले नाही. त्यामुळे सरकारी वकीलांनी त्यांना उत्तर सूचक स्वरुपात प्रश्न विचारले असता कोणतीही बाब समोर आली नाही. त्यामुळे त्याची साक्ष आरोपीवरील ठेवण्यात आलेला गुन्हा शाबीतीसाठी अपयोगाची नाही. अभियोग पक्ष इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यास अपयशी ठरलेला आहे. अभिलेखावर रासायनिक

पृथक्करणाचा अहवाल दाखल करण्यात आलेला नाही. अभियोग पक्ष प्रकरणात कोणताही कागदोपत्री पुरावा शाबीत करु शकला नाही. त्यामुळे अभियोगपक्षाला आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे जावून सिध्द करता आलेला नाही. फौजदारी न्यायतत्वशास्त्रातील तरतुदीप्रमाणे संशयाचा फायदा आरोपीला देणे क्रमप्राप्त आहे. याशिवाय दुसरा पर्याय या न्यायालयासमोर उरत नाही. सबब, मुद्दा क्र. १ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्रमांक २ करीता पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. आरोपी अक्षय बबनराव मेश्राम यांची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाच्या कलम ६५(ई) फौजदारी व प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये खालील दंडणीय गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जमानती बंधपत्र व वैयक्तीक जात मुचलका रद्द करण्यात येतो.

३. आव्हाण याचीकेस सामोरे जाण्याकरिता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ प्रमाणे आरोपीने पुढील सहा महिन्यांकरीता कायम राहिल असे रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र दाखल करावे.

४. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल १० लिटर गावठी हातभट्टीची दारु ही

स. फौ.प्र.क्रं. २८१६/२०२२
शासन वि- अक्षय बबनराव मेश्राम
सीएनआरक्र. एमएचवायए०३००४४२६२०२२
नि. क्र. १४ सोबत

अपील कालावधी संपल्यानंतर संबधीत  अधिकारी, मा. जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे नियमाप्रमाणे विल्हेवाट करण्याकरीता पाठविण्यात यावे.

(न्यायनिर्ण खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

स्वा/-
(शितल एस. मतकर)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यवतमाळ,
(न्यायालय क्र.४), यवतमाळ.

ठिकाण : यवतमाळ
दिनांक २७.०९.२०२३